# सहावे प्रकरण

## शिवाजी सावंतलिखित

## 'मृत्युंजय': वाङ्मयीन चिकित्सा

सहावे प्रकरण

## शिवाजी सावंतलिखित

# 'मृत्युंजय': वाङ्मयीन चिकित्सा

## ६.१ प्रास्ताविक :

महारथी कर्णाच्या जीवनावर आधारित असलेले हे नाटक म्हणजे सन १९६७ मध्ये प्रकाशित झालेल्या शिवाजी सावंत लिखित 'मृत्युंजय' या वाचकप्रिय कादंबरीची नाट्यावृत्ती होय. शिवाजी सावंत 'छावा' ही कादंबरी लिहीत असताना राम मुंगी (दिग्दर्शक) ह्यांच्या मनस्वी इच्छेमुळे व वि.वा. शिरवाडकर, ग.दि. माडगूळकर तसेच ग.वा. बेहरे ह्यांच्या सल्ल्यामुळे त्यांनी हे नाट्यरूपांतर केले. 'मृत्युंजय' ह्या कादंबरीची छोटी दृक्‌श्राव्य प्रतिमा म्हणजे 'मृत्युंजय' हे नाटक होय.

## ६.२. 'मृत्युंजय'चे कथानक :-

प्रस्तुत नाटकातील पहिल्या अंकाची सुरवात होते ती पुढील निवेदनाने : ''प्रत्येक मानवाला लाभते एक सावली आणि-आणि त्याच्याभोवती सदैव गरगर फिरणारे, एक जीवनचक्र-एक नियतीचे चक्र.... किती असंख्य आरे असतात या चक्राला ! स्नेह, श्रद्धा, ममता, वचनप्रियता,औदार्य, वीरता, सोशिकता, धैर्य आणि-आणि शेवटी अलिप्तता......

ह्या चक्राशी झुंज ही केवळ अटळ असते. असेल त्या सामर्थ्यानिशी हे चक्र उद्धरण्यासाठी प्रत्येकाला झटावेच लागते.''[१] नियतीच्या चक्राविषयी शिवाजी सावंतांचे हे मत निवेदक सांगत असतो. ह्याच निवेदन ओघात तो कौरव-पांडव वाढले, बलिष्ठ झाले असून वासंतिक स्पर्धेसाठीचा आखाडा सिद्ध झाला असल्याचे सांगतो. वृषवर्मा हे कुरूकुलाचे अमात्य'' अर्जुन सर्वश्रेष्ठ वीर असून त्याला विजयाची निशाणी असणारी निळकमळाची माळ द्रोण घालतील!'' असे जाहीर करीत असतानाच कर्ण अर्जुनाला द्वंद्वयुद्धाचे आव्हान देतो.' फक्त समान कुळांतील योद्ध्यांतच खेळले जाऊ शकते द्वंद्व' कृपाचार्य असा नितिनियम सांगतात. त्यावर कर्णाची होणारी कुचंबणा पाहून दुर्योधन कर्णाला अंगदेशाचा राजा बनवतो. तेथेच त्याच्या मस्तकी सुवर्णमुकुट ठेवतो. अधिरथ तेथे प्रवेशतो. कर्ण त्याच्या पायांना हात भिडवतो. त्याचवेळेस कृपाचार्य 'कर्ण सुतपुत्र आहे', हे साऱ्यांना सांगत असतात आणि भीम '' सूता ! जा - आपल्या कुळाला शोभणारा प्रतोद हातात घे. या चौथऱ्यावर चढण्यापेक्षा अश्वशाळेत जाऊन राजकुळाच्या घोड्यांना खरारा कर, खरारा ! अधरीय सावरून त्यांची लीद सावर, लीद ! '', अशा शब्दांमध्ये अवहेलना करतो. ह्याच दरम्यान कुंती मूर्च्छित होते. दुर्योधन व कर्ण सोडून सारे तिकडे जातात.

आणि कर्ण ' माझ्या देहावरचं हे सुवर्णी अभेद्यश कवच दुभंगून गेलं, कानातील ही मांसल कुंडलं निखळून पडली, तरी कुरूंच्या युवराजा ! हा सूतपुत्राचा ' घोड्या'चा वारसा सांगणारा स्नेह सावलीसारखा 'अखंड' आणि 'अभंग' तुझ्या पाठीशीच राहील !''[२], अशा शब्दात दुर्योधनाला आश्वस्त करतो.

दुसऱ्या प्रवेशामध्ये कर्णाच्या अंतःपुरात शोण, वसुंधरा, अश्वत्थामा, दुर्योधन, कर्ण ह्यांच्या संवादांमधून कर्णाला कवचकुंडलं का, अश्वत्थाम्याला मणी का, कर्णाच्या सौंदर्यावर हस्तीनापुरातील स्त्रियांचे वेडे होणे आदींवर चर्चा होत असतानाच वारणावताच्या अरण्यात पांडव व कुंती जळून गेल्याची वार्ता घेऊन दूत येतो. हे ऐकून कर्ण सैरभर होतो. पण कर्णपुत्र सुदामनविषयीच्या वार्तालापात प्रसन्न होतानाच परत दुर्योधन येऊन द्रौपदीस्वयंवर व त्यातील पणाविषयी सांगतो. कर्ण त्याला नकार देतो. त्यावर दुर्योधन 'कुरूंच्या हस्तिनापुरात पांचालांच्या पणाचं आव्हान स्वीकारणारा कुणीही धनुर्धर नाही. तुमच्या यःकश्चित मत्स्यापुढं आमची सर्व माणसं हतबल आहेत,' असे म्हणून ' चला, अमात्य ! दूत आणि संदेश तयार करा!''[३] असे फर्मान काढतो. कर्ण आव्हान स्वीकारतो. वृषालीही कुंतीने आपल्या विवाहात दिलेले अंगुलीत्राण देत' आम्ही उभ्या आहोत निरांजनाचं तबक घेऊन, द्रुपदांची सुगंधी गंधाली घेऊन येणाऱ्या कुंडलांना ओवाळायला!'[४] असे सांगत कर्णास प्रोत्साहित करते.

तिसऱ्या प्रवेशामध्ये भीम, अर्जुन व युधिष्ठिर द्रौपदी-स्वयंवराविषयी बोलत असतात. द्रौपदीने केलेला अपमान, कर्णपुत्राचा वध ह्याविषयी चर्चा चालू असतानाच युधिष्ठिर म्हणतो, 'आर्यावर्तात कुणालाच नसलेली अभेद्य कवचकुंडलं लाभलित त्याला भीमसेन... तो सूत आहे, हेच पटत नाही माझ्या मनाला....''[५] ह्याचवेळी कुंती तेथे येते. कुंतीला ते द्रौपदीस्वयंवर, त्याच्यातील द्रौपदीचे कर्णास, '' थांबा आपण नाही घेऊ शकत भाग या स्वयंवरात- मी कुठल्याही सूताची पत्नी वा सून कधीच होणार नाही !'' हे उद्गार सांगतात. तसेच मत्स्यनेत्रभेद न करता धनुष्य फेकून कर्ण गेला, तेव्हा त्याचे हरवलेले अंगुलीत्राण अर्जुन कुंतीला दाखवतो. कुंती अंगुलीत्राण पाहून दचकते व पितामहांच्या जीवनाचा इतिहास सांगत पांडवांना सल्ला देते! ''तुम्हाला खूप शिकायचंय आणि वीरांना नेहमीच सोशीकपणा राजमुकुटापेक्षा शोभून दिसतो.'' ही सारी चर्चा सुरू असतानाच जेव्हा भीम कुंतीस कर्णपुत्र सुदामनाचा वध अर्जुनाने केला, हे सांगतो; तेव्हा ती कासावीस होते. याचवेळी नाटककाराने प्रकाशझोतामध्ये अर्जुनवधाची कर्णप्रतिज्ञा मांडली आहे. कुंती भावनिक कोंडीत सापडून उद्गारते,'' ना .... नाही....नाही.... नाही.... सोसवत नाही आता हे. वाटतं-वाटतं, हस्तिनापुराच्या नगरानगरातील चौकाचौकात उभे राहून- ओरडून सांगावं -मी -मी आहे त्याची माता. कुठं-

कुठं रे चालला आहात तुम्ही सारे ? कुणा-कुणामुळे? माझ्या... माझ्यामुळंच. ''[६] येथेच पहिला अंक संपतो.

दुसऱ्या अंकातील पहिल्या प्रवेशाच्या सुरूवातीस दुर्योधनाच्या राजचर्चेच्या दालनात शकुनी द्यूत खेळत बसला आहे. तेथे दुर्योधन येतो तोच मुळी क्रोधायमान होऊन ! तो शकुनीमामाला द्यूत खेळत बसण्यावरून व त्यांनी दिलेल्या ' खांडववन पांडवांना द्यावे', ह्या सल्ल्यावरून फटकारतो. ' युवराजा! चुकतात कधी कधी फासे बुद्धीच्या आडाख्याचे', असे म्हणत शकुनीमामा त्याला शांत करण्याचा प्रयत्न करतो. तरीही ' काहीऽ काही सुचत नाही मला मामा. इंद्रप्रस्थात पाच भुजंग बलशाली होताहेत दिवसागणिक !' असे म्हणत आपली बेचैन मनःस्थिती प्रकट करतो. त्यांची राजकारणातील सद्यःस्थितीवर चर्चा चाललेली असतानाच अश्वत्थामा येतो. तिघेही जीवनविषयक चर्चा करतात. अश्वत्थामा आत्म्याला सापाची उपमा देतो.'' सर्प जसा एक कात टाकून योग्य वेळी नवी कात धारण करतो, तसाच आत्माही एक शरीर टाकून दुसरं धारण करतो.'' असे तो म्हणतो. त्यासरशी शकुनी 'तुला तो मथुरेचा गवळी भेटला होता की काय अलीकडे?', अशी शंका व्यक्त करतो. ह्याच चर्चेत राजसूय यज्ञात पशू मोजावयास लावल्या गेलेल्या कार्याची व द्रौपदीच्या ' अंध पित्याचे पुत्रही अंधत्र असतात म्हणायचे!'' ह्या वाक्याने क्रोधित झालेला दुर्योधन एक मूक प्रतिज्ञा घेतो -तिला दाखवून देण्याची... की, अंधपित्याचे पुत्रही अंधच नसतात ; तर प्रसंगी एवढे डोळस होतात की-की जगानं जे कधीच पाहू नये तेही बघण्याची इच्छा धरतात !!''[७] ही मूक प्रतिज्ञा तो अश्वत्थाम्याजवळ व्यक्त करतो. अश्वत्थामा जाता जाता कर्ण आपल्या झालेल्या अवमानाने व पुत्रवधाने हस्तिनापूर सोडून जाणार असल्याचे सांगतो. भांबावलेला दुर्योधन 'कर्ण जाता कामा नये' असे म्हणत असतानाच शकुनी मामा 'तू मूकपणे केलेली प्रतिज्ञा वाया जाऊ देणार नाही मी' असा निश्चय करतो. त्याचेवळी तेथे कर्ण येतो. दुर्योधन शकुनीमामाला चतुरपणे 'तुझी, तुझी अर्जुनवधाची प्रतिज्ञा तू कधीच विसरणार नाहीस, हेच सांगत होतो मी याला !' असे सांगतो. त्यासरशी कर्ण 'पांडवांना युद्धाचे निमंत्रण दे !', असा सल्ला देतो व जातो. दुर्योधन व शकुनीमामा द्यूताची मसलत करतात, द्यूतातील सोंगट्या जरासंधाच्या अस्थीपासून बनवण्याचे ठरवितात आणि ह्या द्यूताच्या वेळेस कर्णास अनुपस्थित ठेवण्याची सूचना शकुनीमामा दुर्योधनाला देतो कारण कर्णाने जरासंधाला जीवदान दिलेले असते.

दुसऱ्या प्रवेशात कर्ण आपल्या अंतःपुरात आहे. तो हताश व पिचलेला आहे. कौरवांच्या सभागृहात द्रौपदी वस्त्रहरणापूर्वी कर्ण दुःशासनास म्हणतो,'' द्रौपदी वारांगना आहे. ती कसली पतिव्रता? अशा स्त्रीला पाचपेक्षा एकशे पाच पतीच अधिक पसंत असतात. दुःशासना ! कर-

कर त्या दासीला विवस्त्र ! ''[८], हे स्वतःचे शब्द त्याच्या कानात आता घुमत आहेत. त्या उद्‌गारांचा त्याला आता पश्चात्ताप होत आहे. आपण कलंकित व पदभ्रष्ट ठरलो, असे त्याला वाटते. ' नाही, नाही ती कुलटा नाही', असे म्हणत कर्ण बेभान होत असतानाच वृषाली येते. त्याचदरम्यान अश्वत्थामा ही येतो. पश्चात्तापदग्ध कर्णाला ते दोघेही समजावण्याचा प्रयत्न करतात. शोणही तेथे येतो व द्यूतापासून त्याला दूर ठेवण्याचे कारण सांगतो. कर्ण शोणाला विचारतो, '' तुला तिरस्कार वाटतो माझा ?'' शोण त्याला नकारात्मक उत्तर देतो. अश्वत्थामा, वृषाली, शोण हे सर्वजण पश्चातापदग्ध अशा कर्णाला समजावू पाहतात. अश्वत्थामा त्याला पांडव द्रौपदीसह आणि राजमाता कुंतीसह वनात गेल्याची वार्ता देतो. वनात जाताना कुंतीने दिलेले अंगुलीत्राण अश्वत्थामा कर्णास देतो. ह्याच दरम्यान दुर्योधन येतो. ह्या सर्वांचीच मनःस्थिती उद्‌विग्न आहे. 'पितामह खूप संतप्त झाले आहेत आणि त्यांनी उद्या तातडीची राजसभा बोलावली आहे,' असे दुर्योधन सांगतो. कर्णाने उद्या राजसभेत यावे, अशी त्याची इच्छा असते. द्यूत व द्रौपदीच्या दास्याबद्दल परत शाब्दिक चकमक होते. कर्ण ही ' उद्या जाईन मी सभागृहात घडेल ते फक्त ऐकण्यासाठी.' असे दुर्योधनाला सांगतो. येथे दुसरा प्रवेश संपतो.

तिसऱ्या प्रवेशामध्ये भीष्म दुर्योधनाला राजसभेत फटकारतात.दुर्योधन पांडवांच्या कुळाविषयी बोलत ' कुंती ही पापीण आहे ! आणि पांडव हे कुरुवंशाचे नाहीत !', असे धक्कादायक विधान करतो. त्या वेळेस पितामह भीष्म ' कौरव-पांडव-पांडव-कौरव कुणी कुणीच कुरूकुलोत्पन्न नाहीत.' असे सांगून सत्यव्रतीपासूनचा इतिहास सांगतात व 'मी!! तो शेवटचा कौरव मी आहे ' असे सर्व राजसभेला सांगतात. दुर्योधन उत्तरदायित्वाचा प्रश्न निर्माण करतो. भीष्म 'तुम्ही सर्व एक व्हा', असा सल्ला देतात. दुर्योधन संतापून 'भीमाचा आडदांडपणा व अंध पित्याचे पुत्रही अंधच असतात, असे म्हणणाऱ्या द्रौपदीला कुठला कौरव कशी क्षमा करणार , असे विचारतो.त्याबरोबर भीष्म दुर्योधनाला त्याच्या लाक्षागृह, खांडववनाचे राज्य, द्यूत, रजस्वला द्रौपदीवरील अत्याचार, कुंतीला कलंकिनी म्हटल्याच्याा कृत्यांची आठवण करून देतात. धृतराष्ट्र भीष्मांना शांत होण्यास सांगतात. पण पितामह 'दुर्योधनाची राज्यासक्ती सर्वांना मरणाच्या महानदीकडे घेऊन जात आहे तेही कर्णासारख्या अर्धरथ्याच्या बळावर,' असे सांगतात. ह्यावर उसळून घायाळ होत कर्ण ' पितामह ! मी अर्धरथीसुद्धा नाही. मी आहे एक सारथी', असे विमनस्कपणे उद्‌गार काढतो. भीष्माच्या पांडवगौरवाने व धृतराष्ट्राच्या अगतिकतेला संतापून दुर्योधन,'' नाऽही. मी मूढ नाही. कसल्याच क्षमेची अपेक्षा नाही मला. पितामहांनी कधीच विसरू नये की, कर्ण अर्धरथी नाही. महारथींचा महारथीच आहे. या राज्याचे उत्तरदायी होण्यास कोण पात्र आहे ते आता एकच ठरवील- दंडातलं प्रचंड सामर्थ्य. समरांगणावर!

कुल नव्हे. अंगराज, चला!''[९] असे म्हणत राजसभेतून दुर्योधन व कर्ण जायला निघतात. ह्यावर भीष्म , ' हा राजदंडच जर तुम्हाला मदांध करत असेल, तर तो मी फेकून देतो', असे म्हणत राजदंड समोरच्या संगघडीवर फेकतात. पितामहांनी फेकलेला राजदंड कर्ण दृढ निश्चयाने उचलतो व दिग्विजयाची प्रतिज्ञा करतो. पितामह दिग्विजय कुणी एकट्याने केलेला नाही असे घोषित करतात. ' शेवटच्या कुरूनं फेकलेला हा राजदंड मी पहिला सूतपुत्र म्हणून उठविला आहे- संपूर्ण आर्यावर्ताच्या दिग्विजयासाठी ! !'[१०], असे म्हणतो. भीष्म त्याला आशीर्वाद देतात.

तिसऱ्या अंकाच्या पहिल्या प्रवेशामध्ये ध्वनिमाध्यमाच्या वापरातून सूर्य हा कर्णाला 'इंद्र दान मागण्यासाठी येईल, तेव्हा ते दान देऊ नकोस', असे सांगतो. शोण, अधिरथ, वृषाली हे ही समजावतात पण कर्ण ' देणार, मी इंद्राला कवचकुंडलं दान देणार ! इंद्र हस्तिनापुराबाहेर पडेल.तो कवचकुंडले घेऊनच !' असे सांगतो. दूताने निरोप देताच कर्ण विरोधाला न जुमानता कवचकुंडलाचे दान देऊन टाकतो. कारण याचकाला त्याने कधीच विन्मुख पाठविलेले नसते.

दुसऱ्या प्रवेशामध्ये श्रीकृष्ण व कर्ण ह्यांची भेट होते. श्रीकृष्ण दुर्योधनाकडे शिष्टाई करून परत चालला आहे. कौरव पांडवांचे वैर मिटावे ह्यासाठी तो प्रयत्न करतो. पण दुर्योधन ते प्रयत्न विफल करतो. ' पांडवांना सुईच्या टोकावरील धूलिकणही युद्धाशिवाय मिळणार नाही', असे अविचाराने घोषित करतो. परत निघालेला कृष्ण आपल्या रथातून कर्णाला घेऊन येतो. त्यावेळी श्रीकृष्ण कर्णाला जन्मरहस्य सांगतो, '' कर्णा! तू सारथी नाहीस, तू सूर्यपुत्र आहेस. राधेय नाहीस, आहेस 'कौंतेय', ' कौरव' नाहीस एकशे एकावा, तू- तू आहेस 'पहिला पांडव !' आहेस सूर्यतेजाचा दीप्तिमान वंशज.'' ह्यावर कर्ण म्हणतो '' नाही !! नाही ! मी सूतपुत्र नाही. राधेय नाही. एकशे एकावा कौरव नाही. कौंतेय आणि पहिला पांडव तर नाहीच नाही. मी-मी सूर्यपुत्रही नाही !! मी-मी आहे एक प्रचंड शून्य ! ! प्रचंड शून्य ! !''[११] कृष्ण कर्णाला भ्रांतचित्त होऊ नकोस म्हणून समजावतो. कृष्ण कर्णाला ''चल आपल्या रक्तात, आपल्या बंधूत चल पांडवांत चल. ते तुला राज्याभिषेक करतील. अर्जुन तुझ्या रथाचे सारथ्य करील. चल !'', असा आग्रह करतो. पण आपला पक्ष सोडण्याची कर्ण कल्पनाही करू शकत नाही. कर्ण कृष्णाच्या समजावणीच्या वेळी ''पांडवांना तू परत माझ्याकडे रथात घालून का घेऊन आला नाहीस', असे विचारतो. कृष्णाच्या कोणत्याही आग्रहाला बळी न पडता जाताना मात्र कर्ण भावविव्हल होतो व कृष्णाला पुढील एक निरापेवजा काम सांगतो, '' कृष्णा, कृष्णा- ! पाच पतींची पत्नी पांचालीला, द्रौपदीला सांग- की-की, -या कर्णाच्या अंतःकरणाच्या वीणेची

एक भग्न तार तुझ्या-तुझ्या झाल्या-केल्या अवहेलनेच्या जाणिवेनं सदैव कर्कश झंकारतच राहिली. तिला-तिला सांग, शक्य असल्यास या कर्णाला त्यासाठी क्षमा कर !!!'' [१२] येथे दुसरा प्रवेश संपतो.

तिसरा प्रवेश कर्ण- कुंतीच्या भेटीचा आहे. गंगेच्या काठी कुंती कर्णाला भेटते. कुंती त्याला परोपरीने आपली भूमिका समजावून सांगण्याचा प्रयत्न करते. कर्णाची मनःस्थिती क्षुब्ध असल्याने तो काहीच न ऐकता शब्दांच्या आसुडाने कुंतीला फटकारतो. ह्या संभाषणातून कर्ण जन्म, कुंतीची अगतिकता, कर्णाची झालेली अवहेलना, कुंतीचे कर्ण प्रेम, कर्णाचे कुंतीला 'नकली माता' म्हणणे हे सर्व प्रकटते. अखेरीस कुंती म्हणते,'' होय दिग्विजयी दानवीरा ! तुझ्या-तुझ्या पित्याची माता तरी कुठं आहे जगाला माहीत? तुझ्या जन्मदात्यालाच नाही माहीत 'मातृप्रेम' म्हणजे काय- तर तुला-तुला ते कळावं असा आग्रह कोण आणि कसा धरणार? येते मी...'' कर्ण ह्या उद्‌गारांनी हेलावतो. 'माते, थांऽब !', अशी तो साद घालतो व कुंतीला तिच्या पाच पुत्रांच्या जीवनाचे वचन देतो. ' कर्णाशिवाय अर्जुन किंवा अर्जुनाशिवाय कर्ण.' कारण समाजाला फक्त पाचच मान्य आहेत हे ही तो स्पष्ट करतो. ''माझ्यापेक्षाही मनाच्या सखोल यातना धीरानं हसत सोसणारा तू-तूच माझा सर्वश्रेष्ठ पुत्र आहेस''[१३]असे कुंती म्हणते व आवेगी ममतेने ती कर्णाचे मस्तक बिलगतं घेते. ह्याच वेळेस तिसरा प्रवेश संपतो.

चौथ्या प्रवेशाची सुरवात निवेदनाने होते. महाभारतीय युद्धाचा महायज्ञ पेटला आहे. युद्धाच्या सोळाव्या दिवशी कर्ण कौरवांचा सेनापती होतो. तो महापराक्रम गाजवतो. अर्जुन सोडून चारही पांडवांना तो अभय देतो. सतराव्या दिवशी त्याचे रथचक्र फसते. ते काढण्याचा प्रयत्न तो करीत असतो.ह्यामध्ये कर्णाच्या पराक्रमासह चक्र रणभूमीत जाण्यापर्यंतचा भाग येतो. रथचक्राचेही अंतःकरण खुले होते. '' मी तुझी नियती आहे. आणि या क्षणी फक्त तू माझा आहेस,'' असे नियती त्याला सांगत असते, त्याचवेळी एक चंद्रमुखी बाण सणकारत येतो व त्याच्या कंठाचा वेध घेतो. दुर्योधन, अश्वत्थामा, श्रीकृष्ण, अर्जुन येतात. कर्ण त्याही स्थितीत युद्ध थांबवण्याचा सल्ला देतो. दुर्योधन ती सूचना अमान्य करून '' मृत्यूच्या भयानं हे युद्ध कधीच थांबणार नाही. तुला-तुला साक्ष ठेऊनच ते चालू राहील'', असे म्हणतो. कर्ण हताशपणे श्रीकृष्णाकडे पाहतो. आपली अंतिम इच्छा श्रीकृष्णाला सांगताना तो म्हणतो,'' माझा अग्निसंस्कार तू-तू कर-कुमारी भूमीवर- जिथे कधीच तुणांकुर उगवले नाहीत. म्हणजे माझी दुःखे या भूमीवर कधीच उगवणार नाहीत.'' [१४] हे सांगत असतानाच दुर्योधन त्याही अवस्थेत 'रथदलं सिद्ध करा, चढवा अंबाऱ्या हत्तींवर, कसा पालाणं..... घोड्यांच्या पाठीवर', अशी

आज्ञा देत जातो. कर्ण ' सवितृ मंत्र' उच्चारत असतानाच नाटक संपते.

## कथानकाचे विशेष :-

ह्या नाटकाचे कथानक, बहुतांशी सरळ आणि ओघवते आहे. अश्वत्थामा, दुर्योधन व शकुनी हे तिथे आत्मा- जीवन यांची चर्चा करतात, त्यावेळी हे कथानक रेंगाळताना जाणवते. वासंतिक स्पर्धा, कर्णाचे अर्जुनास आव्हान, सूतपुत्र कर्ण त्यासाठी अपात्र, दुर्योधन त्याला अंगदेशाचा राजा बनवतो. कर्णाचा द्रौपदी स्वयंवरात भाग घेण्याचा प्रयत्न, तेथे द्रौपदीकडून त्याचा अपमान, तेथील युद्धात कर्ण-पुत्र सुदामनचा वध, त्यामुळे कर्णाने केलेली अर्जुन-वधाची प्रतिज्ञा, राजसूय यज्ञात द्रौपदीने दुर्योधनाचा केलेला अवमान, द्रौपदी वस्त्रहरणापूर्वी कर्णाने द्रौपदीची केलेली हेटाळणी, त्याचा कर्णाला झालेला पश्चात्ताप, राजसभेत भीष्मानी दुर्योधनाला फटकारणे, कर्णाला दिग्विजयासाठी त्यानी आशीर्वाद देणे, कर्णाने इंद्राला कवचकुंडलांचे दान देणे, कर्ण-श्रीकृष्ण भेट, त्यात द्रौपदीची हेटाळणी केल्याबद्दल कर्ण पश्चात्ताप व्यक्त करतो, कर्ण-कुंती भेट, त्यात कुंतीचे कर्णावरील निःसीम प्रेम, कर्णाचे फटकारणे- कुंतीला कर्णाचे वचन, शेवटी कौरव सेनापती कर्णाचा मृत्यू- त्यावेळी कर्ण कृष्णाला आपला अग्निसंस्कार करण्याविषयी सांगतो. कर्णाने युद्ध थांबवण्यासाठी सूचना करूनही दुर्योधन युद्ध सुरू ठेवण्याची घोषणा करतो. इतक्या अनेकानेक घटना ह्या नाटकात आल्या आहेत. यातील द्रौपदी स्वयंवर, द्रौपदी वस्त्रहरण ह्या घटना संबंधित व्यक्तींच्या बोलण्यातून कळतात. प्रत्यक्ष ह्या घटनांचे चित्रण येथे आलेले नाही. नाटकाच्या प्रारंभीचे व शेवटचे नियतीचे निवेदन प्रभावी आहे. त्यामुळे कथानकास एक वेगळेच परिमाण लाभले आहे. इतक्या विविध घटनांचा विशाल पट मांडणारे हे कथानक आहे. कथानकातील भरपूर प्रसंगचित्रणांचे हे कितीतरी संमिश्र धागे सावंतांच्या लेखणीतून बांधेसूद व पिळदार बनून येतात. कथानक पुढे पुढे प्रवाहीत होत जाताना हे घटनाचित्रणांचे अनेकानेक पदर हळूवार उलगडत जातात आणि त्यांच्या दर्शनाने वाचक-प्रेक्षक स्तिमित होत जातो.

## ६.३. 'मृत्युंजय'मधील संघर्ष :-

'मृत्युंजय' ह्या अतिशय गाजलेल्या कादंबरीचे नाट्यरूपांतर म्हणजे 'मृत्युंजय' हे नाटक होय. 'मृत्युंजय' ह्या कादंबरीतील कर्णचरित्रातील ज्या अनेक प्रसंगांनी वाचकांना खिळवून ठेवले, ते प्रसंग नाट्यरूपात साकारण्याचा प्रयत्न प्रस्तुत नाटकात शिवाजी सांवतांनी केला आहे. वासंतिक स्पर्धेपासून कर्णाच्या संघर्षाला व नाटकातील एकूणच संघर्षाला सुरूवात होते.

तेथपासून द्रौपदीस्वयंवरातील तेजोभंग,पुत्रवध, द्यूत, पश्चातापदग्ध कर्ण, पितामहांनी फेकलेला राजदंड सूतपुत्राने उचलणे, त्यासाठी दिग्विजयाची प्रतिज्ञा करणे, कवचकुंडलाचे दान, स्वकीयांचा विरोध , कृष्ण-कर्ण भेट, कर्ण कुंती भेट, कर्ण मृत्यू येथपर्यंतच्या सर्व प्रसंगांमध्ये संघर्ष भरलेला आहे.

कर्णाची वासंतिक स्पर्धेतील अवहेलना,'' काय? सारथ्याचा पुत्र? सूतपुत्र? यःकश्चित सारथी? मग आचार्य, तो तो या वीरांच्या आखाड्यात आलाच कसा? धाडसच कसं झालं त्याचं? सूता, जा-आपल्या कुळाला शोभणारा प्रतोद (आसूड) हातात घे. या चौथऱ्यावर चढण्यापेक्षा अश्वशाळेत जाऊन राजकुळाच्या घोड्यांना खरारा कर, खरारा ! अधरीच सावरून त्यांची लीद सावर लीद !!'' ह्या भीमाच्या उद्‌गारांनी संघर्षाची सुरूवात होते. ह्याचवेळेस दुर्योधनाने ' हा कुरूवंशाच्या पराक्रमी वीरांचा आखाडा आहे . एका वीराचा इथं झालेला अपमान कधीच सहन केला जाणार नाही... आज द्वंद्व टळलं आहे दोन योध्द्यांचं - -पण आजच द्वंद्व सुरू झालं आहे... कुणालाही न टाळता येणाऱ्या घटनांचं !! ', असे सांगून कर्णाच्या पाठीशी उभा राहतो. या साऱ्यांतून संघर्ष उभा राहतो व भावी सामाजिक, मानसिक, महाभारतीय युद्धाच्या संघर्षाची ठिणगी पडते. दुर्योधनाच्या वरील उद्‌गारातून कौरव-पांडव संघर्षाचा प्रारंभ होतो.

. भीमाचा कर्णाविषयीचा संताप, युधिष्ठिर, अर्जुन यांचा कर्णाबद्दलचा संयमित तिरस्कार आणि कुंतीच्या अंतःकरणातील कर्णाविषयीचे प्रेम, व्याकुळता हा बाहेरून न दिसणारा पण मानसिक असणारा संघर्ष ह्या नाटकामधून लक्षात येतो. ह्या प्रवेशाच्या शेवटी फ्लॅश बॅक पद्धतीने आलेली कर्णाची अर्जुनवधा ची प्रतिज्ञा आणि त्याच वेळेस कुंती, ' ना- नाही.. नाही. सोसवत नाही आता हे . वाटतं-वाटतं हस्तिनापुराच्या नगरा-नगरातील चोका-चौकात उभं राहून-ओरडून सांगावं -मी-मी आहे त्याची माता. कुठं-कुठं चालला आहात तुम्ही सारे? कुणा-कुणामुळं ? माझ्या-माझ्यामुळंच..'ह्या अशा संवादांमधून नाट्यमय संघर्ष उभा राहतो. तसेच कुंतीचा मानसिक संघर्षही प्रत्ययास येतो. नाटकातील फ्लॅश बॅक तंत्रामुळे हा संघर्ष टोकदार व तीक्ष्ण बनताना जाणवतो.

राजसूय यज्ञाच्या वेळी इंद्रप्रस्थात मयसभेचे दालन बघण्यासाठी गेलेला दुर्योधन अनवधानाने पाण्यात पडतो. द्रौपदी त्याचा अत्यंत कुचेष्टेने अपमान करते. त्या अपमानाचा सूड उगविण्यासाठी दुर्योधन मूक प्रतिज्ञा करतो. ह्यातून दुर्योधनाच्या मनात खदखदत असलेला संघर्ष उभा राहतो.

द्रौपदी वस्त्रहरण प्रसंगात कर्ण बेभानपणे द्रौपदीचा अपमान करतो. नंतर पश्चात्तापदग्ध कर्णाच्या मनात पेटलेला स्वतःविरूद्धचा संघर्षही लक्षणीय आहे.'' जीवनभरची माझी

सूर्यसाधना वाया- वाया गेली. कलंकित- पदभ्रष्ट ठरलो आज मी. कसं कसं बोललो तिला मी हे भरल्या सभागृहात.'', '' हा-हा कर्ण कुरूंच्या राज्यसभेतील भ्याड वाचाळ ठरला... कसा बोललो मी एका कुलस्त्रीची क्रूर विटंबना होणारं?''[१५], हे कर्णाचे उद्‌गार कर्णाच्या मनातील सुरू असलेल्या संघर्षाचे दर्शन घडवतात.द्रौपदीबद्दल हा कर्णमनातील भावसंघर्ष समर्थ शब्दांत प्रकट झाला आहे.

राजसभेमध्ये हताश भीष्म राजदंड फेकून देतात ह्या ठिकाणी त्यांच्या मनातील संघर्ष,व्यक्त झाला आहे. पितामहांचा व दुर्योधनाचा संवाद त्यांच्यातील संघर्ष टोकदार करताना दिसतात. पार्श्वभूमीवर सूतपुत्र कर्णाने आर्यावर्ताच्या दिग्विजयासाठी उचललेला राजदंड, ह्या सर्व तपशीलांमधून एका वेगळ्या मानसिक स्तरावरील संघर्ष आपल्या समोर येतो.

दुर्योधनाच्या स्नेहासाठी, मित्रप्रेमापोटी महाभारतीय संघर्षाला सामोरा जाणारा कर्ण, कुंतीला प्रथम 'माता' न मानणारा, परंतु पित्याचा वारसा सांगताच भावविव्हल होणारा कर्ण, कर्ण-कुंती भेट प्रसंगातील कुंतीच्या व कर्णाच्या मनात सुरू असलेले द्वंद्व, आणि कुंतीची अगतिकता ह्याही तपशिलांमधून भावनिक संघर्षाची उंची वाढलेली दिसून येते. येथे भीष्म -दुर्योधन, भीष्म -धृतराष्ट्र, भीष्म-कर्ण यांच्यामध्ये छेडला गेलेला संघर्ष साकार झाला आहे.

श्रीकृष्ण आणि कर्ण ह्यांच्या भेटीमध्ये श्रीकृष्ण कर्णाला'' तू सूतपुत्र नाहीस, तू सूर्यपुत्र आहेस. तू कौंतेय आहेस. पहिला पांडव आहेस'' असे सांगतो आणि ' पांडव पक्षाकडे चल' असा त्याला आग्रह करतो.त्यावेळी कर्ण आपल्या स्नेह्याच्या पक्षाकडे राहण्याचे ठरवतो व तसे श्रीकृष्णाला सांगतो. जन्मरहस्य कळल्यावर कर्णाच्या मनाची होणारी तडफड, त्यातून व्यक्त होणारा त्याचा दृढ निश्चय आणि श्रीकृष्णाचा आग्रह ह्या साऱ्यांमधून क्रमाने पिळदार होत गेलेला संघर्ष कर्णाच्या व्यक्तिमत्त्वाची उंची वाढवतो. 'कर्ण' ही व्यक्तिरेखाच संघर्षमयी अशी आहे. त्याच्या जन्मापासून सुरू झालेला त्याचा संघर्ष त्याच्या मृत्यूपर्यंत अव्याहतपणे सुरू राहतो. त्याच्या ह्या संघर्षातून कधी भावनिक, तर कधी सामाजिक प्रश्न उभे राहतात. सावंतांनी दाखवलेला कर्णाचा नियतीशी चाललेला आत्मसंघर्ष नाटकाला उंची देण्यास समर्थ ठरतो.

## ६.४. ' मृत्युंजय'मधील व्यक्तिरेखा :

### ६.४.१. कर्ण :

'मृत्युंजय' ह्या कादंबरीतील कर्ण येथे आपल्याला नाट्यरूपात भेटतो. शिवाजी सावंत जन्मतःच कवचकुंडले लाभलेल्या कर्णाची व्यक्तिरेखा रेखाटताना एक अलौकिक व्यक्तिरेखा म्हणूनच त्याच्याकडे पाहतात. तो शूर आहे, वीर आहे , तसाच तो संतापी आहे, विवेकी आहे, तसाच स्नेही आहे. स्नेह हा कर्णाचा गुण ह्या नाटकात अनेक ठिकाणी स्पष्ट झाला आहे.

'अभेद्य कवच दुभंगून गेलं, कानातील ही मांसल कुंडलं निखळून पडली, तरी कुरूंच्या युवराजा! हा सूतपुत्राचा 'घोड्यां'चा वारसा सांगणारा स्नेह सावलीसारखा 'अखंड' आणि 'अभंग' तुझ्या पाठीशीच राहील', 'सूतांनी सदैव स्नेह प्राणमोलाचा मानला आहे.'' राजद्वारात आणि स्मशानात अभंग आणि अखंड उभा असतो तोच खरा स्नेह !! कृष्णा ! कर्ण आणि पांडव या जन्मानं निगडीत जीवनरेषा असतील; पण-पण 'युवराज दुर्योधन' आणि 'सूतपुत्र कर्ण' या पूर्वजन्मानं निगडित जीवनरेषा आहेत,' आदी उद्‌गारांमधून प्रकटणारा स्नेही कर्ण या अजिंक्य म्हणविणाऱ्या अर्जुनाला राजमंडळ आणि कुरूयोद्धे ह्यांच्या समक्ष समस्त हस्तिनापुरवासियांच्या साक्षीनं निर्विवाद, निर्णायक द्वंद्वाचे आव्हान देतो.' अशा प्रकारे वासंतिक स्पर्धेत अर्जुनाला द्वंद्वाचे आव्हान देणारा व निर्वाणीचा इशारा देणाऱ्या भीष्माच्या राजसभेत पितामहांनी फेकलेला राजदंड उचलणारा वीर कर्ण, प्रत्यक्ष पिता सूर्यदेव कर्णाला कवचकुंडलाचे दान इंद्राला देऊ नको म्हणून सांगतो. पण तरीही आपल्या निश्चयावर ठाम असलेला व कवचकुंडलाचे दान देणारा दानशूर व दृढनिश्चयी कर्ण येथे आहे. इंद्रावरही आपला याचक होण्याची वेळ आली, ह्यातच कीर्ती मिळविणाऱ्या दानशूर कर्णाला समाधान वाटते. द्रौपदीच्या वस्त्रहरणाने पश्चात्तापदग्ध होणारा कर्ण. 'हा-हा कर्ण कुरूंच्या राजसभेतील एक भ्याड, वाचाळ ठरला. वृषाली ! तुला तोंडसुद्धा दाखवण्याची पात्रता नाही माझी.कसा बोललो मी कुलस्त्रीची क्रूर विटंबना होणारं?' 'पांचाली ! नाही ! तू-तू वारांगना नाहीस. कुलटा- पतिता नाहीस मी-मीच आहे एक विद्रूप सारथी. भीमा, घे, हा-हा घे आसूड आणि कर खरारा या नीच सारथ्याच्या पाठीचा', 'जीवनभर झालेल्या प्रकट, क्रूर अवमानाची वाटली नाही एवढी वाटते ही व्यथा काळीज तोडणारी. ज्या तोंडून सवितृ मंत्राचे पवित्र शब्द उच्चारले त्याच तोंडून केलेल्या कुरूंच्या कुलस्त्रीच्या कुचेष्ठेची व्यथा', अशा अनेक वाक्यांमधून कर्णाच्या मनाला होणारा पश्चात्ताप व त्याच्या मनातील शल्य प्रकट होत रहाते. पराक्रमी असणारा कर्ण मनाने हळवा आहे, हेच ह्यावरून आपल्या लक्षात येते. पश्चात्तापानंतर उपरती झालेल्या कर्णाला द्रौपदीची माफी मागावीशी वाटत असते. ज्यावेळी कृष्ण व कर्ण ह्यांची भेट होते तेव्हा कर्ण आपल्या मनातील व्यथा कृष्णासमोर मांडतो तो म्हणतो, '' कृष्णा, कृष्णा-, पाच पतींची पत्नी असूनही-पातिव्रत्याच्या पवित्र कळसावर पोहोचलेल्या त्या पांचालीला, द्रौपदीला सांग- की-की,- या कर्णाच्या अंतःकरणाच्या वीणेची एक भग्न तार तुझ्या-तुझ्या झाल्या-केल्या अवहेलनेच्या जाणीवेनं सदैव कर्कश झंकारतच राहिली. तिला-तिला सांग, शक्य-शक्य असल्यास या कर्णाला त्यासाठी क्षमा कर !!!'' कर्णाच्या मनातील सद्भावना आणि सौजन्य वरील प्रसंगातून सावंतांनी समर्थपणे व्यक्त केलेले आहे.

कर्ण-कुंती भेटीप्रसंगी कुंतीविषयी असलेला संताप कर्णाच्या वाक्या-वाक्यातून प्रगट होतो. '' माता? कोण? आपण? अश्रू? आपले अश्रू? राज-अश्रू? आपल्या राज-अश्रूंच्या लडिवाळ सिंचनानं सूत म्हणून जगणाऱ्या सूर्यपुत्राच्या हृदयातले वणवे कधी तरी विझले असते काय? अश्रूच काय? पण-पण पाषाणावर मस्तक आपटून रक्ताळलेले कपाळही माझ्यासमोर या क्षणी धरलंत तरी, तरी त्या रक्ताचीसुद्धा ओळख आता मला पटणार नाही'' [१६], ' का-का आला मातृत्वाचा एवढा कळवळता पुळका आजच आपणाला ? कुठं पाताळात गाडला गेला होता तो गेली सहा तपं ?' , ' माता ! पुन्हा उच्चारसुद्धा करण्याचं धाडस करू नका. त्या पवित्र शब्दाचा! आपल्या देहाची शय्या कुठल्याही पुरुषासमोर अंथरून 'माता' होते की काय कुठलीही स्त्री ?' , असे जळजळीत उद्‌गार कर्णाच्या तोंडून बाहेर पडताना दिसतात. कर्णाच्या मनातील कुंतीविषयीचा उपहास ह्या वाक्यामधून जाणवतो. कर्ण कुंतीला माता न मानता एक स्त्री असेच मानतो. कर्ण कुंतीला 'तू नकली माता आहेस', असेही म्हणतो. परंतु ज्या वेळी कुंती कर्णाला समजावते, तेव्हा हाच संतापी, उद्विग्न कर्ण हेलावून जातो. त्यावेळी त्याच्या हृदयातील मातृप्रेम उन्मळून येते. कर्ण कुंतीच्या पायावर मस्तक ठेवतो व म्हणतो ''केवळ तुझ्यामुळेच मला एक परमोच्च बिंदूचा क्षण मिळाला.'' कर्णाच्या मनातील मातृभाव ह्यावेळी दिसून येतात. कर्ण युद्धामध्ये पांडवांना अभय देऊन मातृप्रेमही व्यक्त करतो.

ब्राह्मणाच्या वेषात आलेल्या इंद्राला आपली कवचकुंडले दान देणारा हा कर्ण त्यागमूर्ती होता. सर्व आप्तेष्टांचा विरोध झुगारून त्याने दिलेले हे दान त्याला किर्तीमान करताना दिसते. त्यानंतर तो ब्रह्मास्त्र मिळवतो. ह्यात त्याचा दृढनिश्चय व त्याचे कष्ट दिसतात.

दुर्योधनाचा स्नेही, मित्र, पाठीराखा, सुडाच्या भावनेने पेटलेला, तसेच परिस्थितीसमोर हतबल झालेल कर्ण असे त्याच्या व्यक्तित्त्वाचे विविध पैलू येथे उलगडताना दिसतात.

कृष्णाला 'अच्युता', 'माधवा', 'जनार्दना' अशा विविध नावांनी हाक मारणारा कर्ण कृष्णावरील आपली भक्ती प्रकट करताना दिसतो. मरतेसमयीसुद्धा आपली दुःखे पुन्हा कोणाच्या वाट्याला येऊ नयेत म्हणून कुमारी भूमीवर दहन करण्याची इच्छा धरणारा कर्ण अशी कर्णाची अनेक रूपे आपणासमोर येतात. आपला अग्निसंस्कार श्रीकृष्णाने करावा, ही त्याची इच्छा उदात्त आहे.

कर्णाच्या जन्मापासून त्याच्या सावलीमागे चालत असलेल्या नियतीपुढे कर्ण अखेर हतप्रभ होतो, हताश होतो. शोकात्म नाटकाच्या नायकाप्रमाणेच कर्णाचाही अंत होतो तो धीरोदात्तपणेच!

हा कर्ण महा पराक्रमी आहे. महाभारतीय युद्धाच्या सोळाव्या दिवशी तो कौरवांच्या पंधरा लाख सैन्याचा सेनापती बनला. त्याच्या अंगच्या शौर्याने आणि दुर्योधनाच्या त्याच्यावरील

विश्वासाने त्याला हे महान पद मिळाले. ' आपल्या मृत्युनंतर हे युद्ध संपावे,' अशी इच्छा तो व्यक्त करतो. ह्यात कर्णाचे विचारी व सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व आपल्याला जाणवते. दुर्योधन पांडवांना युद्धाशिवाय राज्य द्यायला तयार नाही, हा विचार कर्णाला आवडत नाही. म्हणूनच कृष्णाजवळ तो म्हणतो,' बोलू नये ते बोलून गेला तुला दुर्योधन, अविचाऱ्यासारखं'[१७] येथे कर्णाची सद्सद्विवेकबुद्धी जागृत असल्याचे स्पष्टपणे दिसते.

''प्रत्येक माणसाला त्याच्या जन्माबरोबर लाभते नियती. त्या नियतीच्या चक्राला अनेक आरे असतात. ह्या चक्राशी झुंजणे हेच त्याचे जीवन असते. एखाद्याचे जीवनचक्र जन्माबरोबरच धरतीत रूतलेले असते. कर्ण हा त्यातील पहिला मानव. अनिवार्य नियतीचे गरगर फिरणे त्याने सहनशक्तीच्या जोरावर हसत हसत सोसले. साक्षात मृत्युच्याही दारात जीवनाचे चक्र उद्धरणारा धुंद विजय कर्णाएवढा कुणीच उपभोगला नसेल. म्हणूनच तो ' मृत्यूंजय' ठरला !'' कर्णाच्या व्यक्तिरेखेतील हे विविध पैलू कर्णाला महानायक बनवितात. शिवाजी सावंतांच्या लेखणीने येथील कर्णाला असे बलशाली व्यक्तिमत्त्व बहाल केले आहे.

## ६.४.२. दुर्योधन :-

कर्णाचा जिवलग मित्र म्हणूनच दुर्योधनाची प्रतिमा आपल्यासमोर येते. वासंतिक स्पर्धेच्या आखाड्यात कर्णाच्या पाठीशी उभा राहून त्याला धीर देणारा व त्याक्षणी सूतपुत्र म्हणून हिणवल्या गेलेल्या कर्णाला अंगदेशाचा राजा करणारा दुर्योधन आपल्याला दिसतो. कर्ण व दुर्योधनाचा स्नेह हा या नाटकातील एक घट्ट धागा आहे. कर्णाच्या पराक्रमावर त्याचा विश्वास आहे. दुर्योधनाने कर्णाचा मोठेपणा जाणला आहे. कर्णाच्या बळावरच तो अनेक आव्हाने स्वीकारतो. ' आज द्वंद्व टळलं आहे दोन योध्द्यांचं- पण आजच द्वंद्व सुरू झालं आहे... कुणालाही न टाळता येणाऱ्या घटनांचं !! ' असे सुतोवाच दुर्योधन करतो ते कर्णाच्या बळावर विश्वास ठेऊनच! या नाटकातील बहुतांशी संघर्ष या स्नेहबंधामुळेच तोललेले आहेत.

पांडवांबद्दल दुर्योधनाच्या मनात प्रचंड राग आहे. पांडवांमुळे आपली उपेक्षा होते हे तो जाणून आहे. दुर्योधनाचा पांडवांबद्दलचा राग, मत्सर नाटकामध्ये दिसत राहतो. '' बालपणीच माझ्या चार-चार बंधुंना जलक्रिडेच्या नावाखाली गंगेच्या पाण्याखाली कोंडणारा आडदांड भीम मी कसा विसरावा ? अंध पित्याचे पुत्रही अंधच असतात म्हणणाऱ्या द्रौपदीला कुठला कौरव कशी क्षमा करणार?''[१८] राजसूय यज्ञांच्या वेळी बळी देणाऱ्या पशूंची गणती करायला लावणारे पितामह अशा अनेक घटनांमुळे दुर्योधनाचा पांडवांबद्दलचा संताप वाढत जातो. या संतापातूनच भीमाला विष घालणे, वारणावताच्या लाक्षागृहात पांडवांना मातेसह जाळणे, खांडववनाचे राज्य देणे, द्युताचे निमंत्रण देऊन त्यामध्ये पांडवांना शकुनीच्या मदतीने हरविणे,

रजःस्वला द्रौपदीचे वस्त्रहरण करणे इ. घटना घडवून आणतो. तो पांडवांचा सूड घेतच राहतो.

पूर्वी विविध कारणांनी दुर्योधनाचा अपमान झाल्याने तो सूडाच्या भावनेनेच प्रत्येक घटनेकडे पाहतो. ' सूड ही क्रिया नसतेच कधी, ती असते प्रतिक्रिया, कुणाचा तरी पाय पडल्याखेरीज नाही उभारत भुजंगसुद्धा आपली फणा' [१९] हे त्याचे विचार त्याच्या मनोवृत्तीवर व कृतींवर प्रकाश टाकतात. यातील विविध घटनांचा दुर्योधनाच्या मनावर झालेला परिणाम आणि त्याला उमटलेला प्रतिसाद आणि त्याविषयी असमाधानी, संतापी, आक्रमक व शिघ्रकोपी अशी दुर्योधनाची व्यक्तिरेखा नाटकातून साकारते.

हाच दुर्योधन पितामहांच्यासमोर उभा राहताना मात्र ठामपणे उभा राहणारा निर्धारी दुर्योधन आहे. पितामहांनी बोलाविलेल्या राजसभेत तो स्पष्टपणे सांगतो,''पांडव हे 'कौंतेय' आहेत, ' माद्रेय' आहेत पण ' पांडव' नाहीत. ते कुरूकुलातील नाहीत. आणि राजमाता कुंतीदेवी ही पापी पुत्रांना जन्म देणारी एक कलंकिनी स्त्री आहे.'' [२०] असे निर्धाराने व रोखठोकपणे बोलणाऱ्या दुर्योधनाला मग भीष्म पितामहांचा संताप सोसावा लागतो. त्यावर पितामह त्याला सुनावतात. ''कौरव आणि पांडव कुरूकुलात्पन्न नाहीत. मी -मोच शेवटचा कौरव आहे.'' भीष्म पितामहांचा 'तुम्ही सर्व एक व्हा', हा लाख मोलाचा उपदेश तो धुडकावून लावतो. आपल्या स्वार्थामुळेच दुर्योधन अंध झाला आहे असे भीष्मांना वाटते. भीष्मांच्या मताप्रमाणे कर्ण अर्धरथी नाही तर तो महारथी आहे, हेही तो भीष्मांना न कचरता ठामपणे सांगून टाकतो. येथे तो दरबारामध्ये आक्रमक आणि पांडवद्वेषाने पेटलेला वाटतो. अनुभवी वडिलधाऱ्या व्यक्तींचा सल्ला न मानणारा हा दुर्योधन येथे राजदरबारातील मर्यादांचा भंग करणारा आणि पितामह भीष्मांचा अवमान करणारा ठरतो. त्यासाठी प्रत्यक्ष धृतराष्ट्र महाराज 'पितामहांनी शांत व्हावं. माझा पुत्र मूढ आहे. त्याला उदार अंतःकरणानं क्षमा करावी.'[२१] अशी विनंती करतात.

शेवटी कर्णाच्या पतनानंतरसुद्धा ' मृत्यूच्या भयानं हे युद्ध कधीच थांबणार नाही.' असे म्हणणारा क्षत्रिय वीर योद्धा तर '' तो -तोच स्नेह ! नाही विसरलो मी. वीरा, माझे राजद्वार खूप-खूप दूर राहिले अहे- आणि आणि तू-'' असे म्हणून मृत्यूच्या दिशेनेच आपली असलेली वाटचाल लक्षात आणून देणारा दुर्योधन कर्णाचा परम स्नेही आणि पांडवांचा शत्रू म्हणूनच रसिकांच्या लक्षात राहतो.

### ६.४.३. कुंती :-

द्रौपदी स्वयंवरातील प्रसंगाची पांडवांमध्ये चर्चा होत असताना आपल्यासमोर आपल्या पहिल्या पुत्राची-कर्णाची, होत असलेली नालस्ती, अवहेलना सहन करणारी कुंती आपल्याला पहिल्या अंकाच्या तिसऱ्या प्रवेशात प्रथम भेटते. पण रंगमंचावर न दिसतासुद्धा ती अनेक

ठिकाणी माता म्हणून जाणवत राहते. नाटकाच्या सुरूवातीला वासंतिक स्पर्धेमध्ये उत्तररंगात सूतपुत्र म्हणून कर्णाची हेटाळणी होत असताना राजस्त्रियांच्या सौधात कुंती मूर्छित झाल्याची दुतांनी आणलेली बातमी, कुंतीच्या मनातील मातृप्रेम स्पष्ट करणारी आहे.

पुढे कुंती -कर्ण भेटीच्या प्रसंगी सूज्ञ माता हीच तिची भूमिका राहते. कर्णाच्या आक्रस्ताळेपणाचे, मानभावीपणाचे बोलणे ती सहन करते. कुंतीच्या पित्याने वचनपूर्तीसाठी तिचा केलेला त्याग, दुर्वासांनी दिलेला देवहुती मंत्र, अकाली वैधव्य, अशा अनेक वळणांचे दुर्दैवी जीवन जगणाऱ्या कुंतीला अखेरीस 'मी कोण?' असा प्रश्न पडतो. शेवटी कर्णाला त्याच्या पित्याची माता तरी कुठं आहे जगाला माहीत? तुझ्या जन्मदात्यालाच नाही माहीत 'मातृप्रेम' म्हणजे काय- तर तुला-तुला ते कळावं असा आग्रह कोण आणि कसा धरणार ?' या दोन ठिकाणी प्रत्यक्ष रंगमंचावर असणारी कुंती 'माता' स्वरूपात आहे. कर्णाबद्दल प्रेम आणि ओढ असणारी, त्याच्याविषयी पूर्ण वात्सल्य असणारी अनौरस पुत्राची माता तर दुसऱ्या प्रसंगी औरस पुत्रांची माता.

पितामह भीष्मांनी बोलावलेल्या राजसभेत कुंतीविषयी बरीच चर्चा होते. दुर्योधन भर सभेत कुंतीला उद्देशून कलंकिनी, पतिता असे अपशब्द वापरतो. ''एक स्त्री असूनसुद्धा हिमालयाच्या उत्तुंग धैर्यानं तोंड दिलं आहे तिनं सर्व आपत्तींना . तसलं नतमस्तक व्हावं असं धैर्य तुमच्यापैकी एकातही नाही दिसत मला. कुंती प्रातःस्मरणीय आहे.'' [२२] असे भीष्म आदरयुक्त उद्गार कुंतीबद्दल काढतात. यातून नाटकातील कुंतीची व्यक्तिरेखा अधिक गडद, उठावदार होताना दिसते.

आपल्या पहिल्या पुत्राच्या दर्शनासाठी गंगाकाठी आलेली कुंती दृढनिश्चयी आहे. कर्णाला जन्मतःच आपल्याला नदीमध्ये का सोडावे लागले ते ती त्याला समजावण्याचा प्रयत्न करते. कर्णाचा त्यावेळचा जळजळीत उपहास आणि त्याच्या शब्दाशब्दातून उडणाऱ्या क्रोधाच्या ठिणग्या ती अत्यंत धीराने व सहनशीलतेने सहन करते. स्त्री असून ती सोसत असलेल्या यातना मरणाहून भयानक आहेत. बालपणापासूनच कुंतीला तिचे दैव तिला क्रूर थपडा देत हात धुऊन हवे तिथे पिटाळत आले आहे. 'नकली माता' हे कर्णाचे तिखट शब्द ती सहन करते. 'मी तुझी माता आहे.' हे ती कर्णाला परोपरीने सांगते आहे.' पित्याशिवाय जगण्यापेक्षा मोडक्यातोडक्या छत्राखाली का होईना तू वाढशील- म्हणून केला मी तुझा त्याग !'[२३] असे ती सांगते.कुंती कर्णाच्या भेटीला आली आहे ती त्याला त्याच्या बांधवांकडे घेऊन जाण्याच्या निर्धाराने !'[१०] 'तुम्ही सारे एक व्हा' हे ती त्याला सांगते. कर्ण तिला 'नकली माता' म्हणतो, याची तिला खंत वाटते. कर्ण मात्र तिची कोणतीच गोष्ट मान्य करीत नाही. त्यामुळे ती विकल आणि हताश

झाली आहे.

कर्णाला त्याच्या विवाहात उत्तरीय आणि अंगुलीत्राण पाठवणारी कुंती, सुदामनला अंगडं-टोपडं पाठवणारी कुंती, आयुष्यभर सामाजिक संकेतांमुळे दडपली गेलेली व एकटीच आपल्या पुत्रासाठी तळमळत राहणारी माता म्हणून, विकल परिस्थितीपुढे अगतिक झालेली माता. असे विविध पैलू असलेले कुंतीचे व्यक्तिचित्र रसिकांच्या मनात घर करून राहते.

## ६.४.४. भीष्म :-

हस्तिनापुरातील आखाड्यात धृतराष्ट्र महाराजांसह राजमंडळातील उच्चासनावर भीष्म पितामह विराजमान आहेत. वासंतिक स्पर्धेच्या आखाड्यात अर्जुनाने सर्व प्रकारची युद्ध कौशल्ये प्रकट केली आहेत. 'सर्वश्रेष्ठ अजिंक्य धनुर्वीर' असा किताब अर्जुनाला दिला जात असतानाच कर्ण त्याला द्वंद्वयुद्धाचे आव्हान देतो. त्यावर भीष्म कर्णाला संधी देण्याची घोषणा करतात. येथे ते न्यायप्रिय व निष्पक्ष आहेत.' अर्जुनाने केलेले सर्व पराक्रम तू करू शकतोस.' अशी कर्णाला ते उदात्त मनाने व मोकळेपणाने संधी देतात.

द्रौपदीच्या वस्त्रहरणाच्या विचित्र प्रसंगांनंतर पितामह भीष्म निर्वाणीचा इशारा देण्यासाठी राजसभा बोलावतात. याच सभेत दुर्योधन पांडवांना 'कौंतेय'- 'माद्रेय' मानतो पण 'पांडव' मानत नाही. कुंती ही कलंकिनी स्त्री आहे असेही तो सांगतो. त्यावर भीष्म पंडू- धृतराष्ट्र-विदुर यांच्या जन्माची हकिकत सांगतात. 'पांडव हे देवदत्त पुत्र आहेत.' असे ते सुनावतात. 'राजमाता कुंतीने हिमालयाच्या उत्तुंग धैर्याने आपल्यावरील आपत्तींना तोंड दिले आहे. तसे धैर्य तुमच्यात कुणातही नाही.' असेही ते निर्भिडपणे ठणकावतात. दुर्योधन सत्तांध होत चालला आहे. धृतराष्ट्र पुत्रप्रेमापोटी दुर्योधनाचे खेळ खपवून घेत आहे. अशी आपली स्पष्ट व रोखठोक मते त्यांनी राजसभेत जाहीर केली आहेत. ते सत् पक्षाचा विचार करतात. सत्तेचा त्यांना लोभ नाही. आपले कर्तव्य ते साहसाने पार पाडतात. दुर्योधनाच्या कृष्ण कृत्याचा पाढा ते वाचतात. धृतराष्ट्राला ते पुत्रांना पाठीशी घालू नकोस असा इशारा देतात आणि 'तुम्ही सर्व एक व्हा' असा निर्वाणीचा सल्ला कळवळून देतात. यात भीष्मांची न्यायप्रियता, कुल व राज्य रक्षण करण्याची तळमळ, खोटेपणाची चीड, असत्याचा तिरस्कार, आणि स्वार्थपरायणता या सद्गुणांचे दर्शन घडते. संतापाने राजदंड फेकून दिल्यावर तो राजदंड हातात घेऊन त्याच्या सन्मानासाठी दिग्विजयासाठी बाहेर पडणाऱ्या वीर कर्णाला ते आशीर्वाद देतात. त्या अगोदर याच कर्णाचा 'अर्धरथी' असा उल्लेख करतात. पण त्यानंतर राजदंडाच्या सन्मानासाठी कर्ण उभा राहिला आहे याची खात्री पटताच ते त्याला 'जा गंगाभक्ता, या गंगापुत्राचा तुला आशीर्वाद आहे!''[२४] असे उदात्तपणे सांगतात.

तर असे हे पितामह भीष्म या नाटकात 'पितामह' या पदाला शोभून दिसतात. न्यायकठोर, निर्भिड, त्यागसंपन्न व शौर्याचा पाठिराखा असे पारदर्शी व्यक्तिमत्त्व म्हणूनच भीष्म वाचकाच्या मनाचा ठाव घेतात.

## ६.४.५. इतर पात्रे :-

वृषाली, श्रीकृष्ण, भीम, शोण, अश्वत्थामा, शकुनी, अर्जुन, युधिष्ठिर , अधिरथ, अमात्य, कृपाचार्य, धृतराष्ट्र, व दूत ही सर्व पात्रे दुय्यम स्वरूपाची, कर्ण कथा पुढे नेणारी आहेत. तरीही कौरवांचा व कर्णाचा द्वेष्टा व कर्णाला उपदेश करणारा व त्याला जन्मरहस्य सांगून पांडव पक्षात येण्याचा आग्रह धरणारा कृष्ण आपल्या लक्षात राहतो. तसेच कर्णावर पत्नी म्हणून नितांत प्रेम करणारी, कुंडले देऊ नका म्हणून सांगणारी व द्रौपदी वस्त्रहरणानंतर कर्णाची चूक दाखवताना '' पण पण स्त्रीमधील कोमल स्त्रीत्वाचे आपलेही भान सुटले-स्वामी. खूप,खूप चुकलात आपण जीवनात- पहिल्यांदा.'' [२५] असे म्हणणारी कर्णपत्नी आपल्या लक्षात राहते कारण तोल जाणाऱ्या कर्णाला ती सावरत असते. शोण तर पडछायेसारखाच वावरताना दिसतो. पण ही सारीच पात्रे कथानकाला गती देणारी ठरतात. संपूर्ण नाटक कर्णाभोवतीच फिरते. यामध्ये प्रत्यक्ष न दिसणारे पण तरीही विचार करावयास भाग पाडणारे एक निवेदन म्हणजे रथचक्राचे. जणू काही नियती हे पात्रच बनते. ' याक्षणी धरतीत फसलेलं मी तुझ्या रथाचं केवळ चक्र नाही...... मी ... मीच केला आहे तुझा त्याग अश्वनदीत.' इथपासून ''थांब, व्यर्थ झटू नकोस- या क्षणी - या - क्षणी फक्त तू - माझा -माझाच आहेस!!'' असे म्हणणारे नियतीचे चक्र पात्र म्हणून नसते पण तरीही आपल्या मनावर एक वेगळा ठसा उमटवते.

## ६.५. 'मृत्युंजय'मधील संवाद व भाषासौंदर्य :-

'मृत्युंजय' हे पौराणिक नाटक असल्यामुळे यातील व्यक्तिरेखांच्या तोंडी असणारे संवाद पुराणकाळाला शोभतील असे आहेत. तसेच कथानकाला वेग देणारे आहेत. कर्ण जीवनातील अनेक घटना येथे येतात त्या त्या नुसार संवाद आपल्यासमोर येतात. हे संवाद भावपूर्ण तर आहेतच पण प्रसंगी सडेतोड पद्धतीचेही आहेत. या नाटकामध्ये पेरलेल्या निवेदन पद्धतीमुळे कथानकातील सुटलेले धागे जुळविण्यास मदत होते.

संवादांमधून घडून गेलेल्या घटना तसेच व्यक्तींचे मनोभाव समजतात. उदा. वृषवर्म्याचे वासंतिक स्पर्धेचे निवेदन, दुर्योधनाचे ' आचार्य विसरता आहात आपण. धर्मशास्त्र ! त्यालाही म्हणतं क्षत्रिय-ज्याच्या बाहुत असतं प्रचंड सामर्थ्य !'' असे स्फुलिंग व संघर्ष छेडणारे संवाद, दुर्योधन- कर्णाच्या संवादातून, द्रौपदीने केलेला अपमान, वृषालीच्या संवादातून कर्णाविषयी असणारे प्रेम, कुंतीने दिलेले अंगुलीत्राण, उत्तरीय इत्यादी भेटवस्तूंविषयी माहिती मिळते.

कुंतीच्या स्वगतामधून तिचे स्वतःचे जीवन, पितामह भीष्मांची महानता,कर्णाविषयी असणारे प्रेम, व काळजी यांची माहिती मिळते. भीष्मांच्या संवादातून कुरूकुलाचा इतिहास, दुर्योधनाने पांडवांना ठार मारण्यासाठी घडवून आणलेल्या घटना, तसेच कृष्णाच्या संवादातून कर्णाचा पराक्रम, त्याचा झालेला अपमान, त्याला मिळालेला शाप यांची माहिती होते.

कर्णाची पुत्रवधानंतरची विजयधनुष्य फिरवत केलेली प्रतिज्ञा, भीष्मांनी राजसभेमध्ये फेकलेला राजदंड उचलल्यावर, '' खड्गांना खड्गं भिडतील - याच्यासाठी.

गदांचे स्फुलिंग उडतील- बाणांचा पर्जन्य कोसळेल-याच्यासाठी

चक्राचे आरे फिरतील - समरांगणे रंगतील -याच्याचसाठी !

पितामह, वीर हो - प्रसंगी रक्ताच्या नद्या वाहतील- याच्यासाठी !!- तरी-तरीही हा त्यावर तरंगतच राहील. कारण तो कुरूंचा आहे. हस्तिनापूरचा आहे. परंपरेचा आहे.

शेवटच्या कुरूनं फेकलेला राजदंड- मी पहिला सूतपुत्र म्हणून उठविला आहे.- संपूर्ण आर्यावर्ताच्या दिग्विजयासाठी !!'' [२६] अशा वीरश्रीयुक्त शब्दांत कर्ण दिग्विजयाची प्रतिज्ञा करतो. कुंती-कर्ण यांच्यामधील संवाद आपल्या पीळदार बांधणीने नाटकाला अनेक घटना व दीर्घ प्लॉट लाभूनसुद्धा गतिमान करतात.

या नाटकातील संवाद कथानकाला गती देणारे असले तरी काही ठिकाणी कंटाळवाणे, तसेच जडजंजाळ वाटतात. उदा. - अश्वत्थाम्याचे तत्त्वज्ञान पाल्हाळिक स्वरूपाचे वाटते, शकुनी - दुर्योधनाचे संवाद, अश्वत्थामा- दुर्योधनाचे संवाद, याचबरोबर '' हा सूतपुत्राचा 'घोड्या'चा वारसा सांगणारा स्नेह सावलीसारखा 'अखंड'आणि 'अभंग' तुझ्या पाठीशी राहील.''[२७] 'ज्यांच्या हृदयाची राजकमळं वेळोवेळी पायदळी तुडवली जातात, उरतात पाकळ्या, उद्ध्वस्त झालेले रापट काळे देठ, त्यांनाच कळतं आणि पटतंसुद्धा '' [२८] अशी वाक्ये उपमांच्या व अनुप्रासांच्या नादाला लागून भावार्थ घालवून बसल्यासारखी वाटतात. ही पल्लेदार वाक्ये संवादाचा सहजपणा घालवून बसतात.

या नाटकामध्ये कथानकाच्या दृष्टीने महत्त्वाची पण लुप्त असलेली अशी व्यक्तीचित्रणे संवादाच्या माध्यमातून प्रत्ययास येतात. त्यापैकी एक म्हणजे द्रौपदी. द्रौपदीविषयी बरीचशी माहिती पांडव, कर्ण, दुर्योधन यांच्या संवादांतून समजते. स्वयंवर वृत्तांत पांडवांच्या संवादातून समजतो. कर्णपत्नी वृषाली व शोण यांच्या संवादांतून कर्णपुत्र सुदामनचा उल्लेख येतो. ह्या पात्रांविषयी संवादांमधूनच वाचक-प्रेक्षकांना कळते.

'मृत्युंजय' नाटकाची भाषा सरळपणे कथानक गतीमान करणारी आहे. कर्णाच्या आयुष्यातील अनेक घटना नाटकामध्ये पीळदारपणे येत असल्यामुळे त्यातील वैचारिक,

तत्त्वचिंतक आणि सुविचारात्मक भाषेचा बाज पकडण्याचा प्रयत्न नाटककार करताना दिसतो. कर्ण, दुर्योधन, कुंती आणि भीष्म यांच्या मनातील त्या-त्या प्रसंगीच्या विशिष्ट भावना अचूक शब्दात पकडण्याचे सामर्थ्यही या भाषाशैलीत आहे. सामान्यपणे व्यक्तींच्या मनातील विचार आणि भावना सहज व प्रवाहीपणे प्रकट करणारी ही भाषा अगदी क्वचितच ठिकाणी जडजंबाल बनताना दिसते.

" धीर धरावा स्वामी", " स्वामी, या काळ्या आठवणीही अर्पून टाकाव्या त्याच गंगेला आणि धैर्यशील व्हावं."[२९] हे धर्मपत्नी वृषालीचे कर्णाची समजावणी करणारे संवाद भावकोमल आणि विनयशील आहेत. या संवादांमधून वृषालीचे प्रेमपूर्ण व कातर मन दिसते.

" माणसाचं शरीर म्यानासारखं असतं आणि त्याचं मन असतं त्या म्यानातील खड्गाच्या तीक्ष्ण पात्यासारखं ! अगदी धारदार." , " आणि अशा या जीवनरूपी खड्गाची आत्मा ही एक मूठ असते. तिला धारण करणारे हात असतात अज्ञात आणि अनंत." हे गुरूपुत्र अश्वत्थाम्याचे माणसाच्या शरीर-मन व आत्म्याविषयीचे मनोगत उपमा- रूपकाच्या अलंकारांमधून प्रगट झाले आहे. ह्या संवादांमधील चिंतनशीलता लक्षणीय आहे. पुढे अश्वथामा सांगतो," अगदी सोप्या दृष्टांतात सांगायचं तर आत्मा हा सर्पासारखा असतो. सर्प जसा एक कात टाकून योग्य वेळी नवी कात धारण करतो तसाच आत्माही एक शरीर टाकून दुसरं धारण करतो. काय मामा, पटतं?"[३०] ह्या संवादांतील वक्तृत्त्व गुण सहज लक्षात येतो. भीष्म आणि दुर्योधन, कृष्ण आणि कर्ण, कुंती आणि कर्ण यांच्यातील संवाद तर खटकेबाज आणि त्या त्या प्रसंगीची भावना आणि वातावरण तोलून धरणारे आहेत. कुंती आणि कर्ण यांच्यातील विवादात कर्णाचे संवाद उपहासाने आणि त्याच्या मनातील जळजळीत विखाराने भरून गेले आहेत. कर्ण- "नाळ? आकाशाची नाळ ? ती नाळही न तोडता आपण टाकलेला बाळ आता आपल्या पुत्रांचा काळ झालेला बघून हे नकली माते, मुकाट अश्रू ढाळ. जा. अश्वनदीच्या पात्रावर सोडलेल्या माझ्या जीवननौकेला आता विश्वाच्या खवळत्या महासागरात थोपविण्यासाठी तुझ्या या सुरकुतल्या हाताचं सुकाणू मुळीच समर्थ नाही. कर्ण तुझा पुत्र नव्हता. कधीच असणार नाही."[३१] रूपकाच्या शैलीतील हा संवाद कर्णाच्या वक्तृत्वाचा नमूना आहे. मातेविषयी कर्णमनातील विखार इथे शब्दाशब्दात खचाखच भरलेला जाणवतो.

" अरे, तो दुर्योधन, तुम्ही सारे जिवंत असता भरल्या सभागृहात म्हणतो- पांडव कुंतीचे धर्मपुत्र नाहीत. ती पापिणी आहे. आणि आज स्वतःला दुर्योधनाचा स्नेही म्हणवून घेणारा प्रत्यक्ष तूच मला म्हणतो आहेस-तू 'नकली' माता आहेस, निर्दय आहेस, अरे मग कुणी तरी एकदा मला सांगा रे - मी आहे तरी कोण?"[३२] - कुंतीच्या ह्या संवादात तिच्या मनाचा

पारदर्शीपणा व्यक्त होतो तसा कळवळाही प्रकट होतो. एक अनुभवसंपन्न आणि नितळ मन इथे व्यक्त झाले आहे. कुंतीच्या व्यक्तित्वातील सहनशीलता व सोशीकपणा व्यक्त करणारी ही भाषाशैली म्हणूनच समर्थ व ललित सुंदर आहे.

" राजा, सांग तुझ्या पुत्रांना, माणसाला सर्वात क्रूर करतो तो त्याचा स्वार्थ. भुकेनं व्याकुळ झालेला सिंहसुद्धा ती शमविण्यासाठी एखादाच प्राणी मारून खातो. पण सांग त्यांना, तो कधीच दुसरा सिंह मारून नाही खात ! पण स्वार्थानं पेटलेला माणूस लक्षावधी माणसंही मारण्यास मागंपुढं नाही पाहात. सांग त्याला-तो लक्षावधी वीर योध्द्यांना मरणाऱ्या महानदीकडे घेऊन चालला आहे, या कवचकुंडलधारी एकट्या कर्णाच्या बळावर. पण ते टिकणारं नाही, ज्याच्यावर तुझ्या दुर्योधनाचा सर्व विश्वास आहे तो कर्ण आहे केवळ एक अर्धरथी !" [३३] ह्या पितामह भीष्मांच्या संवादात त्यांच्या मनातील दुर्योधनाविषयीचा क्रोध काठोकाठ व्यक्त झाला आहे. ह्या संवादातील इशारा भीष्मांच्या व्यक्तिमत्त्वातील दूरदर्शीपणा व्यक्त करतो.

एकंदरीत ह्या नाटकातील संवाद वक्तृत्वसंपन्न व धारधार आहेत. ह्या संवादांमधील खटकेबाजपणा प्रसंगांतील नाट्य अधिकच खुलवितो. हे संवाद व्यक्तीच्या स्वभावावर प्रकाश टाकतात. तो तो प्रसंग उठावदार करण्यात ह्या संवादांचा वाटा मोठा आहे.

ह्या नाटकातील संवादांची भाषाशैली अर्थातच सामर्थ्यशाली आहे. म्हणूनच नाटकातील नाट्य अधिक पीळदार व घट्ट झालेले आहे. वाचक-प्रेक्षकाला खिळवून ठेवण्याचे सामर्थ्य ह्या बलशाली भाषाशैलीत आहे. ही भाषाशैली प्रसंगानुसार मृदू-मुलायम होते तर कधी क्रोधाच्या दाहक ठिणग्या बरसते. तो तो प्रसंग वाचकाच्या मनात घुसून साकारतो. तो ह्या सामर्थ्यशाली भाषासौंदर्यामुळेच ! हे भाषासौंदर्य चोहोबाजूंनी खुलविणारी शिवाजी सावंतांची लेखणी म्हणूनच कसदार व नवे नवे उन्मेष प्रकट करताना दिसते. ही भाषाशैली कर्ण आणि वृषाली यांच्यातील प्रेम संयमाने व्यक्त करते तर ' इंद्राला मी कवच कुंडलांचे दान करणाच' असा कर्णाचा भक्कम निग्रह व्यक्त करते. थोडक्यात ह्या नाटकातील विविध भावभावनांनी भरलेले प्रसंग येथील विविध रूपीणी भाषाशैली समर्थपणे साकार करताना दिसते. ही ताकदवान भाषाशैली हे अर्थातच शिवाजी सावंत यांच्या लेखणीचे बळ आहे.

## ६.६. 'मृत्युंजय'मधील नाट्यसौंदर्य :-

'मृत्युंजय' ही कर्णाची जीवनकहाणी शिवाजीराव सावंतांनी लिहिली. ती कादंबरी रूपात समर्थपणे पेललीसुद्धा आहे. या कादंबरीचे नाट्यरूपांतर व्हावे म्हणून श्री. राम मुंगी व निर्माता रमाकांत राक्षे सावंतांकडे आले. त्यांनी हे सामर्थ्य कुसुमाग्रजांचे म्हणून वरील रंगकर्मींना कुसुमाग्रजांकडे पाठविले. पण कुसुमाग्रजांनी उलट निरोप दिला, " या कादंबरीवर तुम्ही नाटक

नक्की लिहू शकाल.'' आणि यामुळेच कर्ण कहाणी नाट्यरूपात आली.

कर्णाचे जीवनच मुळी संघर्षमय असल्यामुळे नाट्याला सौंदर्य आपोआपच प्राप्त होत गेले. तरीही नाटकात घेतलेला प्रदीर्घ प्लॉट हा वैचारिक संघर्षाला क्षीण बनवतो. उफाळणाऱ्या भावनांना मर्यादितता देतो. मृत्युंजय कादंबरीला विशालता लाभली ते तिचे बलस्थानही झाले. पण नाटकात विस्तृत प्लॉटमधील घटना पकडणे हे नाटककारासह रंगकर्मीनादेखील अवघड होऊन बसते.

पण शिवाजी सावंतांनी हे साध्य करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्यावर असणारा कादंबरीचा प्रभाव आपणाला वारंवार लक्षात येतो. त्यामुळे काही अंशी बांधणी कमकुवत वाटते. चरित्र कहाणीचे कथन वाटते.

असे जरी असले तरीही कर्णाच्या जीवनात नाट्यमयता भरपूर असल्यामुळे ती नाट्यमयता अचूक शब्दांत पकडत गेल्यामुळे या नाटकाचे सौंदर्य वर्धिष्णू राहिले आहे.

निवेदक व नियतीचे रथचक्र यांनीही प्रभावी निवेदनाद्वारे यामुळे वेगळाच बाज या नाटकाला प्रदान केला आहे.

'नियतीच्या हातातील मानव हे एक खेळणे आहे.' हे शेक्सपिरीयन शोकात्म नाटकांनी सांगितलेले तत्व तो अभिनिवेश न घेताही ह्या नाटकातून आपणासमोर येते. कर्णाचे महानपण नियतीला मान्य नव्हते म्हणूनच की काय ती त्याच्याशी क्रूर चेष्टा करत राहिली, असे हे नाटक वाचून व पाहून रसिकांना वाटून जाते.

म्हणूनच 'या क्षणी फक्त तू माझाच आहेस' असे म्हणणारी नियती समाजातील अनेक कर्णांची आठवण करून देते.एकंदरीतच समर्थ कादंबरीकाराने आपल्याच शैलीत मृत्युंजय लिहिण्याचा प्रयत्न केला आहे, असे म्हणावेसे वाटते.

पहिल्या अंकात प्रारंभी निवेदन येते. ज्याचे जीवनचक्र जन्माबरोबरच धरतीत फसलेले असते, त्यातील 'कर्ण' हा पहिला मानव आहे. जीवनातील संकटांशी हसत हसत झुंज द्यावी हेच तो सांगतो. मृत्यूच्या दारातही जीवनाचे चक्र उद्धरणारा कर्ण ' मृत्युंजय' होता. अशा अर्थाच्या निवेदनानंतर गंगा नदीकाठचा प्राचीन सूर्योदय रंगभूमीवर येतो. त्यापुढे गायत्री मंत्राचे स्वर, आणि अर्ध्य ह्यांचे वातावरण येते. पुढे हस्तिनापुरातील वासंतिक स्पर्धेच्या आखाड्यामध्ये अजिंक्य वीर म्हणून अर्जुनाची निवड करण्यात येते. कर्ण त्याला आव्हान देतो. सूतपुत्र असल्याने तो स्पर्धेत भाग घेऊ शकत नाही. दुर्योधन तिथेच त्याला अंग देशाचा राजा बनवून मुकुट घालतो. इथे कर्ण दुर्योधनाला अखंड मैत्रीचे आश्वासन देतो. वारणावताच्या अरण्यात पांडव मातेसह आगीत जळाले असा निरोप दुर्योधनास कळतो. दुर्योधन कर्णाला द्रौपदी स्वयंवरातील पण

जिंकण्यासाठी जाण्यास प्रवृत्त करतो. स्वयंवर मंडपात कर्णास सूतपुत्र म्हणून भाग घेता येत नाही. द्रौपदी कर्णाला थांबवते. अर्जुन पण जिंकतो. त्यांनतरच्या युद्धात कर्णपुत्र सुदामन यास अर्जुन ठार मारतो. त्यावेळी कर्ण अर्जुनवधाची प्रतिज्ञा करतो.एवढा कथाभाग पहिल्या अंकात आला आहे.

दुसऱ्या अंकात शकुनी-दुर्योधन यांचा युधिष्ठिराला द्यूताचे निमंत्रण देण्याचा डाव, दुर्योधनाचा इंद्रप्रस्थात मयसभेत द्रौपदीने केलेला अपमान, द्रौपदी वस्त्रहरणापूर्वी कर्णाने द्रौपदीचा कुलटा असा उल्लेख केला त्याबद्दल त्याला झालेला पश्चाताप, कुंतीसह पांडवांचे वनात प्रस्थान, भीष्मांनी फेकलेला राजदंड उचलून दिग्विजयार्थ बाहेर पडणारा कर्ण,- एवढ्या घटना आल्या आहेत. यातील अनेक घटनांची वर्णने घटना घडून गेल्यानंतर केली जातात. त्यातून ते प्रसंग वाचक-प्रेक्षकांना कळतात.

तिसऱ्या अंकात देवराज इंद्राला कर्णाचे कवच-कुंडलांचे दान, त्याला वृषाली, शोण, अधिरथ यांचा विरोध, श्रीकृष्णाची कर्णाशी भेट, त्यात कर्णाला पांडवपक्षाकडे येण्याचे आवाहन, कर्णाचा नकार, कुंतीची कर्णाशी भेट, तिचाही पांडवांकडे येण्यासाठी कर्णास आग्रह, कर्णाचा नकार, आणि रणभूमीवर रथाचे फसलेले चक्र उद्धरताना कर्णाचा झालेला मृत्यू. ह्या घटना येतात. ह्या साऱ्या घटना इथे तीन अंकांच्या अवकाशात विविध प्रवेशांमधून मांडण्यात आल्या आहेत. यातील बऱ्याच घटना संवादांतून वाचकांपर्यंत जातात. असे असले तरी इतक्या भरपूर घटना नाटकात बसवताना शिवाजी सावंतांची दमछाक झाली आहे. त्यातही अश्वत्थामा हे पात्र त्यात आणून मानवी शरीर-मन-आत्मा-जीवन यांची त्याच्यामार्फत घडविलेली चर्चा नाटकात थोडी अस्थानी वाटते. ह्या चर्चेत कर्ण, दुर्योधन आणि शकुनी यांचाही सहभाग आहे. हे एकंदरीत विपरीत वाटते. घटना खचाखच भरल्याने प्रवेश रचनेत समतोल साधणे कठीण झाले आहे. त्यातही कर्ण-श्रीकृष्ण भेट, कर्ण-कुंती भेट, भीष्मांना दुर्योधनाने केलेला विरोध, विजयी आखाड्यात अर्जुनास कर्णाचे आव्हान, द्रौपदी वस्त्रहरणावेळच्या आपल्या कुशब्दांचा कर्णास होणारा पश्चाताप हे प्रसंग नाटकात खूपच पीळदारपणे आले आहेत. ह्या प्रसंगातील नाट्य उत्तम रितीने इथे उलगडले गेले आहे.

ह्या नाटकातील कर्ण, दुर्योधन, कुंती, भीष्म श्रीकृष्ण आणि अश्वत्थामा यांच्या व्यक्तिरेखा उजळ झाल्या आहेत. ह्या व्यक्तिरेखा प्रकट करताना शिवाजी सावंतांच्या लेखणीला बहर येतो. विशेषतः कर्णाची व्यक्तिरेखा त्यांच्या लेखणीचा अत्यंत आवडता विषय आहे. अर्जुनाला आव्हान देणारा शूर कर्ण, इंद्राला कवच कुंडले देणारा दानशूर कर्ण, भीष्मांसमोर ताठ मानेने उभा राहणारा स्वाभिमानी कर्ण, कुंतीच्या भेटीवेळी झालेला क्रुद्ध कर्ण, कृष्णाला नकार देणारा

दृढनिश्चयी कर्ण, वृषालीजवळ द्रौपदीस उद्देशून बोललेल्या वाईट शब्दांबद्दल पश्चाताप व्यक्त करणारा कर्ण- अशी कर्णाची विविध रूपे नाटककाराने ताकदीने शब्द साकार केली आहेत. कर्णाच्या स्वभावातील त्या त्या भावना त्या त्या ठिकाणी समर्थपणे व्यक्त करणारी भाषाशैली सावंतांच्या लेखणीत सामावली आहे.

अर्जुन-कर्ण, कृपाचार्य-दुर्योधन, श्रीकृष्ण-कर्ण, भीष्म-दुर्योधन, भीष्म-कर्ण व कुंती-कर्ण यांच्यातील संघर्ष नाटककाराने टोकदार करण्याचा प्रयत्न केल्याने नाटकातील प्रसंग वाचकाच्या मनात घर करताना दिसतात. नियतीशी कर्णाचा चाललेला संघर्ष संपूर्ण नाटकभर विखुरलेला आहे. कर्णाच्या मृत्यूच्या वेळचे रथचक्राचे निवेदन भारदस्त आहे. कर्णमृत्यूचा हा प्रसंग संपूर्ण नाटकावर कळस चढविणारा आहे. रथचक्राचे-नियतीचे येथील निवेदन माफक व प्रभावी झाले आहे. त्यामुळे कर्णाच्या मृत्यूचा येथील प्रसंग अधिक गहिरा होताना दिसतो. तो वाचकाच्या मनावर कारूण्यपूर्ण ठसा उमटविण्यात यशस्वी होतो. कर्णाच्या तोंडी घातलेल्या सवितृ मंत्राचा नाटककाराने चातुर्याने वापर करून घेतला आहे. महाभारतीय वातावरण जागवण्याचा प्रभावी प्रयत्न त्याद्वारा त्यांनी केला आहे.संपूर्ण नाटकाचे लेखन अभिजात वादी झाले आहे.

सावंतांनी नाटकाची रचना बरीच बंदिस्तपणे करण्याचा प्रयत्न केला आहे. बऱ्याच ठिकाणी तो साध्यही झाला आहे. काही ठिकाणी मात्र हा प्रयोग त्यांना जमला नाही, हे जाणवते. कर्णाच्या घरी अश्वत्थामा येतो, आणि मानवी जीवनाच्या स्वरूपाबद्दल तो बोलू लागतो. तसेच शकुनी आणि दुर्योधन यांच्याबरोबर तो शरीर-मन आणि आत्मा यांच्याविषयी रूपकात्मक भाषेत बोलू लागतो. इथे मात्र नाटक रेंगाळल्यासारखे वाटू लागते. मूळातच कर्ण चरित्रातल्या विविध घटना नाटकात बंदिस्त करताना सावंतांना खूपच सावधगिरी बाळगावी लागली आहे. त्यात ही अशी दृश्ये अगर प्रवेश थोडे विसंगत वाटू लागतात. हा मोह टाळता येण्यासारखा होता. त्या अवकाशात कर्णाला ब्रह्मास्त्राची प्राप्ती असे न आलेले प्रसंग रंगविता आले असते किंवा दुसरे प्रसंग जास्त सामर्थ्यवान करता आले असते. पण या झाल्या जर-तर च्या गोष्टी. आजही 'मृत्युंजय' हे नाटक मराठी रसिकांच्या पसंतीला उतरलेले अव्वल दर्जाचे नाटक आहे, हे मान्यच करावे लागेल.

व्यक्ती-व्यक्तीतील संघर्ष, व्यक्तींच्या मनातील संघर्ष तसेच व्यक्ती आणि परिस्थिती यांच्यातील संघर्ष असा कर्णाचा तीन पातळ्यांवरील संघर्ष व्यक्त करण्यात सावंत यशस्वी झाले आहेत.

'' मृत्युंजय' मधील कर्ण सत्प्रवृत्त, सदाचरणी, त्यागी, समर्पणशील, दानशूर, उदार असा

एक आदर्श पुरुष आहे......... प्रसंग आणि व्यक्ती यांच्या संदर्भातील ऐतिह्य वास्तवाचा अपलाप न करता कर्णाचे अंतरंगचित्रण करण्याचे महत्त्वाचे आव्हान समर्थपणे पेलण्यात 'मृत्युंजय' चा लेखक यशस्वी झाला आहे.'' हे डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर यांचे कादंबरीबद्दलचे मत नाटकाबद्दलही खरे ठरते.

## ६.७. समारोप :

कर्णाची उत्तुंग व्यक्तिरेखा साकार करण्यातील यश, वीरश्री, प्रेम, स्वाभिमान, उपहास, विरोध, मैत्री, आदर, वत्सलता व निर्धार या कर्णचरित्रातील विविध भाव भावना समर्थपणे व्यक्त करण्यातील कौशल्य, भाववाही सबळ भाषाशैली, सहज-सुंदर व प्रवाही संवाद, कथानकाची जास्तीजास्त बंदिस्त बांधणी, महाभारतीय वातावरण जपणारी अभिजात व दर्जेदार भाषा, सुवर्णी-गुंतवा-कमळकळा -भावरत - सूर्यवाणी यांसारख्या खास शब्दांचा चपखल वापर, नियती-रथचक्र-सूर्य यांचे सूचक व भारदस्त निवेदन, बोली भाषेतील जोरकस वक्तृत्वाचा जागोजागी कुशल वापर, महाभारतातील कथा-प्रसंगांचे अनेक ठिकाणी विखुरलेले भरपूर संदर्भ, उपमा, रूपक, उत्प्रेक्षा, अनुप्रास इ. अलंकारांचा भाषेतील मुक्त वापर इ. अनेक वाङ्मयीन गुणांमुळे सावंतांची 'मृत्युंजय' ही एक श्रेष्ठ नाट्यकृती ठरते.

***

## ६.८. संदर्भसूची


१. शिवाजी सावंत मृत्युंजय -कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे
द्वितीयावृत्ती - १९९६ - पृष्ठ -१

२. पहा तत्रैव पृष्ठ १३

३. ,, तत्रैव पृष्ठ २५

४. ,, तत्रैव पृष्ठ २६

५. ,, तत्रैव पृष्ठ २७

६. तत्रैव पृष्ठ ३४

७. तत्रैव पृष्ठ ४१

८. पहा तत्रैव पृष्ठ ४५

९. पहा तत्रैव पृष्ठ ६०

१०. तत्रैव पृष्ठ ६३

११. तत्रैव पृष्ठ ७७

१२. तत्रैव पृष्ठ ८२

१३. तत्रैव पृष्ठ ९४

१४. तत्रैव पृष्ठ ९७/९८

१५. तत्रैव पृष्ठ ४६

१६. तत्रैव पृष्ठ ८४-८५

१७. तत्रैव पृष्ठ ७३

१८. पहा तत्रैव पृष्ठ ५९

१९. तत्रैव पृष्ठ ४०

२०. तत्रैव पृष्ठ ५६

२१. तत्रैव पृष्ठ ६०

२२. तत्रैव पृष्ठ ५७

२३. पहा तत्रैव पृष्ठ ८९

२४. तत्रैव पृष्ठ ६४

२५. तत्रैव पृष्ठ ४६

२६. तत्रैव पृष्ठ ६३

२७.		तत्रैव पृष्ठ १३

२८. पहा	तत्रैव पृष्ठ २०

२९.		तत्रैव पृष्ठ ४९

३०.		तत्रैव पृष्ठ ३९

३१.		तत्रैव पृष्ठ ८७

३२. पहा	तत्रैव पृष्ठ ८९

३३.		तत्रैव पृष्ठ ५९/६०

३४.		संपादक, देसाई जयराम, युगंधर साहित्यिक, कमळाई प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती -२००२ पृष्ठ -२०८/२०९

■■■■■